ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

# भारतीय महिलाच्या विकासात शिक्षणाचे योगदान, अडचणी व उपाय – एक चिकित्सक अभ्यास

*** जितेंद्र सुधाकर सोनवणे**

*पद-जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे*

**** प्रा. डॉ. मारोती निवृत्ती गायकवाड**

*सहाय्यक प्राध्यापक, समाजकार्य महाविद्यालय, चोपडा ता. चोपडा जि. जळगाव*

**गोषवारा :**

*संत तुकडोजी महाराज म्हणतात की, "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' ख-या अर्थाने पाहिले तर स्त्री ही निसर्गाणे निर्माण केलेलं एक नैसर्गीक सामर्थ्य आणि मानवी समाजाला मिळालेली एक नैसर्गीक देन आहे. तिच्या अंगी अणेक गुणधर्म तर आहेच आहेत मात्र ती संयमधारी आणि नव निर्मिती करुशकनारं सामर्थ्य आहे. आणि म्हणून जर समाजाचा आणि राष्ट्राचा खरोखर अधिकाधीक विकास करायचा असेल तर प्रत्येक सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात महिलांचा सहभाग जास्त सक्रीयेतेने वाढवायला हवा. आणि यासाठी स्त्रियांना जास्तितजास्त शिक्षित करणे अत्यंत आवश्यक आहे.*

*भारतीय संविधानाने अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा म्हणून संविधानात अधोरेखित केले आहे. पण याबरोबरच आरोग्य आणि शिक्षण या मानवाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक व महत्त्वाच्या गरजा आहेत, त्यांना देखिल प्राधान्य देण्यात आले आहे. कारण स्वामी विवेकानंद म्हणतात की, "शिक्षणामुळे मानसाच्या अंतर्गत जे पूर्नत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण त्याला करता येते. कोणतेच ज्ञान बाहेरून येत नाही. मानसाला ज्ञान होते ह्याचा अगदी काटेकोर मानशास्त्राच्या भाषेत अर्थ हा की, तो आवरण दूर करतो". शिक्षणामुळे समाज आणि पर्यायी देशाचा विकास होतो हे खरे असले तरी मात्र स्त्रियांच्या बाबतीत याचा विचार फारसा गांभीर्याने केला जात नाही. शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकासाचे साधन व व्यक्तिमत्व विकासाची संधी निर्माण करणार माध्यम आहे. शिक्षणामुळे मानसाच्या जिवनात अमुलाग्र बदल घडून येतात. त्याचा सर्वांगीण विकास शिक्षणामुळे होऊ शकतो. शिक्षणामुळेच मानसाची बौद्धिक उन्नती होते. आणि आर्थिक विकास सुद्धा साधता येतो. कित्येक वर्षापासून जातीव्यवस्था, वर्णभेदासारख्या अनिष्ट रूढी, परंपरांमुळे समाज मागासच राहिलाच पण दारिद्र्य, पुरुषसत्ताक कुटुंबपद्धती, बालविवाह पद्धती, समाजाची मानसिकता इत्यादी अनेक प्रकारचे अडथळे स्त्री शिक्षणासाठी भारतात येतात. परंतु ज्या स्त्रिया समाजसुधारकांच्या प्रयत्नाच्या अभ्यासातून, शिक्षक व प्रसारमाध्यमे यांच्या माध्यमातून जे हे अडथळे पार पाडतात व शिक्षण घेतात त्या भारतीय स्त्रिया त्यांचे सामर्थ्य सिद्ध करु शकतात व समाज कारणासह राजकारणात, अर्थकारणात नावलौकीक मिळवू शकतात हे सिद्ध झाले असल्याचे अणेक नामवंत महिलांचे दाखले उपलब्ध आहेत. सदर संशोधन हे शिक्षणामुळे*

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

*महिलांच्या जिवनात झालेले परिवर्तन तपासण्यासाठी असून सदर संशोधनासाठी संदर्भग्रंथ, इंटरनेट, मासिके, साप्ताहिके व वर्तमानपत्रे या दुय्यम माहिती स्रोतांचा आधार घेण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.*

**कळशब्द (Key Words) :** *मानवी समाज, भारतीय संविधान, मुलभूत गरजा, शिक्षण, भारतीय स्त्रिया, विकास, सामर्थ्य, बौद्धिक उन्नती, ज्ञान, संधी, संस्कार, कुटूंब.*

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना :-**

भारतीय संविधानाने अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच आरोग्य आणि शिक्षण या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. आणि म्हणून सर्व भारतीयांना या गरजांची पुर्तता करण्यात यावी अशी संविधानिक तरतूद करून ठेवली आहे. शिक्षणामुळे मानवाची मानसिक शक्ती वाढते, शिल बनते, बुद्धी चौफ़ेर आणि विशाल होते. अमाप ज्ञान प्राप्त होते, उत्कृष्ट शिक्षणामुळे मनावर चांगले संस्कार होऊन चारित्र्य संपन्नता येते. शिक्षणामुळे माणूस स्वाभिमानी होतो, स्वत:च्या पायावर उभा रहातो. अणेक विकासाच्या संधी त्याला प्राप्त होतात. मानसाचा सर्वांगीण विकास साधला जातो. माणसाच्या जीवनाला एक अर्थ प्राप्त करून देऊन त्याचा व त्यायोगे समाज व राष्ट्राची उन्नती साधनारे साधन म्हणजे शिक्षण होय. म्हणून हे शिक्षणाचे शस्त्र जर स्रीच्या हाती आले तर केवळ तिचाच नाही तर कुटूंबाचा समाजाचा व पर्यायी राष्ट्राचा देखिल विकास झपाट्याने होतो, असे प्रगत देशातील स्थिती पाहुन लक्षात येते. पंडीत जवाहरलाल नेहरू म्हणत की, “You Can Tell the condition of a nation by looking at the status of its women”. कोणत्याही देशातील विकास हा त्या देशात उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीवर तर अवलंबून असतोच असतो त्याचप्रमाणे त्या देशातील शारीरिक व बौद्धिक शक्ती यावर देखिल अवंलंबुन असतो. आणि म्हणून राष्ट्रहिताच्या दृष्टीणे हि शारीरिक व बौद्धीक संपत्ती वाढविण्यासाठी व प्रबळ करण्यासाठी स्त्रियांना देखिल समान पातळीवर शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक आहे. आज जे जे देश जगात प्रगत झालेले आहेत किंवा प्रगती पथावर आहेत त्या देशांचे निरिक्षण केल्यास असे निदर्शनास येते की, त्या त्या देशात विकास प्रक्रीयेत पुरुषांबरोबर स्त्रियांचादेखील सक्रीय सहभाग असतो. आज भारत देखील विकासाच्या वाटेने वाटचाल करणारा देश आहे. मात्र भारतात स्त्रियांना पुरातन काळापासून मातेचा, देविचा दर्जा देण्यात आलेला असतांना देखिल बहुसंख्य स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहिल्याने विकासाच्या प्रक्रियेत त्या मागे राहिलेल्या दिसून येतात. भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत दुय्यम दर्जा दिलेला दिसून येतो. स्त्रियांना काही अपवाद वगळता त्यांच्या अंगी असलेल्या कला गुणांना व अक्कल हुशारीला पुरेसा वाव व संधी मिळालेली नाही. विषेत: मुघल व इंग्रज सत्ता भारतात स्थापीत झाल्यानंतर स्त्रियांच्या सन्माचा दर्जा खालावत गेला. भारतातील पुरुषप्रधान

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

संस्कृतीमुळे स्त्रियांना नेहमीच असमान वागणुक मिळत आलेली आहे. व त्याला जुन्या रुढी परंपरा व प्रथा याची मिळालेली जोड यामुळे स्त्रियांची दुर्दशा दिवसेंदिवस वाढतच चाललेली दिसते. स्त्रियांच्या मुळ दुख:चे कारण जुन्या व अनैसर्गीक आणि अन्यायी परंपरा तर आहेतच आहेत मात्र शिक्षणापासून वंचित असणे किंवा पुरेसे शिकण्याची संधीच न मिळणे स्त्रियांच्या दुःखाचे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे मूळ कारण आहे. म्हणून समाजाचा व राष्ट्राचा ख-या अर्थाने विकास घडवून आणायचा असेल तर स्त्रियांना देखिल समान पातळीवर शिक्षण दिले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "महिलांनी ज्या प्रमाणात प्रगती केली आहे त्यावरून मी समाजाची प्रगती मोजतो." यावरून स्त्रियांना प्रगती पथावर नेणे हे राष्ट्राच्या व समाजाच्या हिताचे आहे. आणि त्यासाठी सर्व स्त्रिया शिक्षित होणे अत्यंत आवश्यक आहे हे लक्षात येते. सध्यस्थितीत भारतात शिक्षणामुळे स्त्रियांनी विविध क्षेत्रात साधलेले यश प्रचंड दिसून येत असले तरी त्यात आणखीन वाढव होणे अपेक्षित आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये संदर्भग्रंथ, इंटरनेट, मासिके, साप्ताहिके व वर्तमानपत्रे या दुय्यम माहिती स्रोतांचा आधार घेऊन स्त्री शिक्षण हे महिलांच्या जिवनात परिवर्तन आनणेसाठी आवश्यक आहे. याविषयी विचार मांडण्यात आलेले आहेत.

**विषयाचे महत्व :-**

या संशोधन पेपरचा उपयोग देशाच्या व समाजाच्या विकासासाठी स्त्री शिक्षणाचे महत्व काय आहे याची समाजाला व स्वत: स्त्री वर्गाला जाणिव होईल. शिवाय स्त्री सक्षमीकरणासाठी कार्यरत शासन स्तरावरील संस्थांना स्त्रियांच्या शिक्षणाविषयी उपाययोजना आखतांना, नियोजन करतांना व अंमलबजावणी करतांना उपयोग होऊ शकतो. तसेच विविध सामाजिक संस्था, संघटना यांना देखील महिला विकासाशी निगडीत कार्यक्रम राबवितांना या शोधनिबंधचा उपयोग होणार आहे. त्याचप्रमाणे नविन संशोधन करणा-या संशोधक विद्यार्थ्यांना देखिल या शोधनिबंधातील माहितीचा उपयोग होईल.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

शिक्षणामुळे महिलांच्या जिवनात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

महिला शिक्षणाचा अर्थ समजून घेणे.

महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

महिलांचे शिक्षण कमी असण्यामागील कारणे अभ्यासणे.

स्त्रियांच्या शिक्षण वाढविणेसाठी उपाययोजना सुचविणे.

**भारतातील महिलांची शैक्षणिक स्थिती:-**

अतिप्राचीन काळी भारतीय स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अत्यंत मानाचे स्थान दिले जात होते. मैत्रेयी, गार्गी यांच्यासारख्या पुण्यश्लोक महिलांना वेद-उपनिषत-कालात ऋषींचा मान होता. वेदवेत्त्या दिग्गज पंडीतांच्या सभेत गार्गीने ब्रम्हविवादचर्चेत याज्ञवल्क्यांना निर्भयपणे आव्हान दिल्याची नोंद आहे. मात्र पुढे पुरुष प्रधान संस्कृती उदयाला आली आणि नाना स्मृती ग्रंथ रचून आणि नाना कठोर नियम-बंधनांनी जखडून टाकून पुरुषाने स्त्रीला जनू केवळ प्रजोत्पादक यंत्र बनवून टाकले. त्यात भर म्हणून मुघल साम्राज्य व इंग्रजांची सत्ता भारतावर आल्यानंतर भारतीय स्त्रियांचा मानाचा दर्जा त्यांचे सामाजिक, धार्मिक स्थान घसरायला लागले. अनेक सामाजिक व धार्मिक नियम व परंपरांच्या नावाखाली स्त्रियांना एकप्रकारे अंशतः बंदिस्त जिवन जगावे लागले. अणेक अनुचित प्रथांबरोबर स्त्रीयांची शिक्षणबंदी

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

ही अनुचित प्रथासुरू झाली. स्री ही देवी चे रुप आहे, तिच्या हातात घर आणि संस्कार असतात. ति दयाळू आणि पुर्ण कुटूंबाची देखभाल करणारी वत्सल व्यक्ती असते, ती देव स्वरूप असते तिने मर्यादेत रहाण्याने समाज व्यवस्था टिकुन रहाते. अशी गोंडस भुलावन करून स्रियांना नेहमी मागे ठेवण्यात आले. मुलगी दहा-बारा वर्षांची झाली की, घर झाडणे, लहान भावंडांना सांभाळणे, कपडे धुणे, क्वचित प्रसंगी स्वयंपाक करणे ही कामे तिच्यावर लादली जातात. सासरी जाऊन तिने नीट काम करावे, कोणाला उलट उत्तरे देऊ नये, सर्वकाही सोसत राहावे यासाठीची प्राथमिक तयारी तिच्याकडून नकळत करून घेतली जात असते. मुलीला हट्ट करून हक्काने कुठलीही गोष्ट मिळवता येत नाही. उलट हट्टीपणा करणे वाईट, सहनशीलता चांगली हे तिच्या मनावर लहानपणापासूनच बिंबवले जाते. अगदी तिचे स्वतःचे लग्न केव्हा व्हावे याबाबत सुद्धा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तिला नसते. आज ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये नोकरी करणाऱ्या, छोटा व्यवसाय करून, मजुरी करून पैसा मिळवणाऱ्या स्त्रिया पुष्कळ आहेत. परंतु त्यांना जो काही पैसा मिळतो तो खर्च करण्याचे स्वातंत्र्य सुद्धा नाही. अर्थात त्या कमावत्या असून देखील त्यांना हवा सन्मान दिला जात नाही. मात्र हेही सत्य आहे की, स्रियांना योग्य तो सन्मान दिल्यानेच कोणतेही राष्ट्र उन्नत पदास पोहचू शकले आहे. नारी महात्म्याची यथोचित बूज न ठेवणारा कुठलाही देश कधी उन्नत झालेला नाही आणि होणारही नाही. याची जाणिव असलेल्या तत्कालीन शिक्षित भारतीय समाज सुधारकांनी इंग्रज सत्तेच्या काळी पुढे येऊन स्री शिक्षणाचा आग्रह धरला व त्यादृष्टीने कार्य देखिल केले. त्यात महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रघुनाथ धोंडो कर्वे इत्यादी असे अनेक समाज सुधारकांनी भारतीय स्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी चळवळींच्या माध्यमातून संघर्ष केला. पुढे स्वतंत्र भारतात संविधान निर्माण करतांना संविधानात स्रियांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी कायदे तयार करून समाविष्ट करण्यात आलेत. मात्र तरी देखील अपेक्षित परिणाम अद्याप प्राप्त झाल्याचे समाधानकारक चित्र दिसत नाही.

सरकारने सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे म्हणून मागील काही काळात भारतीय स्रियांच्या स्थितीत शिक्षणामुळे अनेक महत्वाचे बदल झालेले दिसून येत आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील पुरुषांच्या तुलनेत स्रियांची संख्या दर हजारी 943 इतकी आहे. म्हणजे जवळ जवळ अर्धी संख्या स्री वर्गाची आहे. सन 1901 च्या जनगणेच्या वेळी पुरुषांची शैक्षणिक स्थिती 9.83 टक्के तर स्रियांची स्थिती 0.6 टक्के अशी होती, तर 2011 च्या जनगनणेनुसार भारतात एकुण 82.14 टक्के पुरुष तर 65.46 टक्के माहिला शिक्षित असल्याचे दिसून येतात. हि भारतातील स्री पुरुष शिक्षणाची तफ़ावत 16.68 टक्के इतकी आहे. यावरून असे दिसून येते की, भारतात सुरुवातीला इंग्रजांच्या पारतंत्र्यात असताना पुरुषांच्या शिक्षणाच्या प्रमाणापेक्षा स्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी होते. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात जागतिकीकरणानंतर भारतात स्री शिक्षणाचे प्रमाण वाढले. शिक्षणासाठी मुलींना खास शिष्यवृत्त्या, मोफत गणवेश, पुस्तके व वह्या, याशिवाय दुपारचे जेवण उपलब्ध झाले. त्यामुळे ग्रामीण भागात साक्षरता वाढण्यास मदत झाली आहे. शिवाय आज स्रियांना अत्यंत दर्जेदार व कौशल्याधिष्ठित शिक्षण उपलब्ध झाले आहे. शिक्षण हक्क कायदा – 2009 मध्ये आल्याने सर्वांना शिक्षणाचा हक्क मिळाला आहे. त्याचा फार

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

मोठा प्रभाव स्त्री-शिक्षणावर झाला आहे. त्यामुळे मुलींची शिक्षणातील संख्या वाढून गळतीचे प्रमाण कमी झाले आहे. तरी अपेक्षित परिणाम अजून आढळून येत नाही. यासाठी शासन स्तरावरून स्त्री शिक्षणासाठी ज्याप्रमाणे प्रयत्न होतात तसेच प्रत्येक कुटुंब, समाज स्तरातून महिलांच्या शिक्षणासाठी आग्रह धरणे अगत्याचे आहे. आणि यासाठी स्वत: स्त्री पालकांनी पुढाकार घेणे महत्वाचे आहे.

**शिक्षणामुळे भारतीय स्त्रिच्या जिवनात झालेला सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास:-**

15 ऑगस्ट, 1947 ला भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर धर्म, जात, वंश, लिंग भेद नसावा म्हणून सर्वांसाठी समान कायदा असावा व हा कायदा सर्वांना सारखाच लागू व्हावा यासाठी विचारविनिमय करण्यात आला आणि भारतीय संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महतप्रयत्नाने निर्माण करण्यात आले. संविधानात महिलांच्या उन्नतीसाठी समाविष्ट करण्यात आलेल्या कायद्यातील तरतुदींनुसार महिलांना शिक्षणाची कवाडे उघडी झाली आणि म्हणूनच शिक्षणामुळे आजची भारतीय महिला सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात पुरुषांप्रमाणेच विकसीत झालेली दिसते. भारतीय महिलांना शिक्षणामुळे अणेक संधी उपलब्ध झाल्यामुळे महिलांच्या विकासाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. आज अणेक क्षेत्रात मान्यवर म्हणून महिला मोठ्या सन्मानाने वावरतांना दिसतात. केवळ राजकारणच नाही तर आर्थिक क्षेत्रात, संशोधन क्षेत्रात, भारतीय सैन्य दल, नेव्ही, एअरफ़ोर्स व इतर आर्मड फ़ोर्सेस, उद्योग व्यापार क्षेत्रात, शासकीय वरिष्ठ अधिकारी पदावर, चित्रपट उद्योग, अन्न पुरवठा उद्योग, शेती व शेती पुरक व्यवसाय, गृह उद्योग, औषध इंडस्ट्री आणि शैक्षणिक क्षेत्रात असं अनेक क्षेत्रात आज महिला अत्यंत यशस्वी झालेल्या दिसून येतात. आणि त्यामुळेच त्यांना त्यांच्या कुटुंबात आणि एकुणच समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त झाल्याचे निदर्शणास येते.

**भारतातील महिलांचे शिक्षण कमी असण्यामागील कारणे :-**

1) मुलींच्या शिक्षणा विषयी असलेली सामाजिक उदासिनता
2) दारिद्र्य.
3) शाळा घरापासून दूर असणे.
4) बालविवाह प्रथा.
5) लग्नानंतर मुलगी ही परक्याचे धन ही भावना.
6) मुलगा हाच खरा कुटूंबाचा वारस व वंशाचा दिवा ही भावना.
7) कुटूंबातील मुलांची संख्या
8) बाहेर गावी शिक्षणास पाठविल्यास मुलींची छेडछाड होण्याची भीती.
9) ग्रामिण भागात मुलींच्या शिक्षणाचे महत्व याबाबत जागृती नसणे.
10) पालकांचे रोजगारासाठी हंगामी स्थलांतर.
11) अशिक्षित पालक.
12) मुली आईला घरात व रोजगारात मदतीला येतात म्हणून शाळेकडे दुर्लक्ष.

**भारतात महिलांचे शिक्षण वाढविण्यासाठी उपाययोजना :-**

1. भारतीय समाजातील व्यक्तींची मानसिकता बदलणे.
2. दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे व सर्वसामान्यांना परवडेल असे स्वस्त शिक्षण उपलब्ध करून देणे.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

3. शाळेतील अंतर कमी करणे/ ऑनलाईन प्लॅट फ़ोरम चा वापर करणे.
4. शाळेच्या दृष्टीणे एसटी बसेस ची सुविधा उपलब्ध करणे.
5. बालविवाह प्रथा बंद करणे.
6. हुंडाप्रथा बंद करणे.
7. स्त्री पुरुष हा भेद दुर करण्यासाठी जनजागृती करणे.
8. लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाय योजना राबविणे.
9. पालक व मुलींना दामिनी सारख्या पथकाची माहिती देऊन आश्वस्थ करणे.
10. ग्रामिण भागात मुलींच्या शिक्षणाचे महत्व याबाबत जनजागृती करणे.
11. स्थलांतरीत मुलांसाठी वस्ती शाळा असतात याची माहीती पालकांना देणे.
12. पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी त्यांचे समुपदेशन करणे.
13. शालेय मुलींना सुरुवातीपासूनच शिष्यवृत्ती देणे.

**निष्कर्ष :-**

कुठल्याही व्यक्ती विषेशाच्या जिवनात परिवर्तन घडवून आणायचे महत्वाचे साधन कुठले असेल तर ते शिक्षण आहे. आणि म्हणून स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले" असा विचार मांडून त्यांनी शिक्षणाचे महत्व विषद केले आहे. म्हणून भारतीय स्त्री च्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करून तिला सामाजिक, राजकीय व आर्थिक पटलावर अणेक विविध संधी निर्माण करून देणारे महत्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हे केवळ एका स्त्रीला घडवत नाही तर तिच्या शिक्षणामुळे तिचे कुटूंब, समाज व राष्ट्र देखिल विकसीत होत असते. शिकलेली विकसीत महिला ही प्रत्येक समाजजीवनाच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे. आणि म्हणून कुठल्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे त्यावरून ठरते. मात्र जागतीक पातळीवर व भारतात आंतरराष्ट्रीय महिला वर्षापर्यंत स्त्री-मुक्तीचा प्रश्न शासनकर्ते कळीचा प्रश्न समजत नव्हते. परंतु सर्वसामान्यपणे 1975 नंतर स्त्री-मुक्तीचा प्रश्न राजकीय कार्यक्रमातील एक महत्वाचा भाग झाल्याचे दिसते. अलिकडे भारत सरकार व राज्य शासनाने महिलांच्या विकासासाठी व शैक्षणिक उन्नती करीता अणेक महत्वाकांक्षी योजना राबविल्या आहेत व अद्याप देखील राबवित आहेत. या मध्ये सर्व महिलांना 12 वि पर्यंतचे शिक्षण मोफ़त करण्यात आले आहे. वारसा हक्क मिळण्यासाठी कायदा अस्तित्वात आणून अंमलात आणला आहे. त्यामुळे महिलांना कुटूंबात सन्मानाचे स्थान तर मिळत आहेच पण त्यांना शिक्षण घेण्यासाठीचे मार्ग मोकळे झाले आहेत. अणेक जनजागृतीपर कार्यक्रम शासन स्तरावरून व सामाजिक संस्थांकडून राबविले जात आहेत. ‘बेटी बचाव बेटी पढाव’ सारख्या कार्यक्रमांमधून मुलींना शिक्षित केले पाहीजे ही भावना समाजमनात रुजविली जात आहे.

शासन स्तरावरून अनेक उपाय योजना राबविल्या जात आहेत. मात्र गरज आहे ती भारतीय महिलांनी आपल्या मुलां मुलींचे संगोपन करतांना त्यांना समानतेची वागणूक देऊन त्यांना वाढवायला हवे ही त्यांची सामाजिक जबाबदारी आहे. त्यांनीच आपल्या पाल्यांना डोळसपणे, सजगपणे वाढविणे अत्यंत

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

आवश्यक आहे. मुलांप्रमाणेच मुलींना देखिल त्यांचा विकास साधण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे आणि तो मुलींचा मुलभूत हक्क आहे याची जाणिव कुटूंबातील प्रत्येक सदस्याला करून द्यायला हवी. केवळ स्त्रियांनीच नाही तर कुटूंबातील पुरुषांनी देखील हिच भूमिका घेतल्यास कुटूंबाचा देखिल आर्थिक विकास होऊन समाजात मानमरातब वाढेल. यामुळे हळू हळू स्त्री पुरुष समानता तर येइलच मात्र स्त्रियांच्या शैक्षणिक प्रगतीमुळे कुटूंब, समाज व देशाचाही तिच्यासह विकास होईल. शिक्षणामुळे महीला अत्यंत आत्मविश्वासाने व निर्भीडपणे समाजात वावरताना दिसू लागतील. महिला शिक्षणाचे अनेक फायदे आहेत. कमी प्रमाणात महीला आज प्रत्येक क्षेत्रात आपला शिक्का निर्माण करतांना दिसत आहेत. जर शिक्षणाचे प्रमाण महिलांमध्ये वाढले तर निश्चितच हा विविध क्षेत्रातील विकसीत महिलांचा आकडा वाढल्याखेरीज रहाणार नाही. महिला शिकली तर तिला शिक्षणाचे महत्व समजते आणि म्हणूनच शिक्षीत महिला आपल्या मुलांना कधीही अशिक्षित राहू देणार नाही. लहानपणापासूनच ती आपल्या मुलांना शिक्षणाचे महत्व पटवून देईल. आज आपला भारत देश हा नक्कीच महिला शिक्षणात सातत्याने उत्तम प्रगती करत आहे. मात्र यात समाजाचेही योगदान अपेक्षित आहे.

**संदर्भसुची:-**

1. ब्रम्हस्थानंद स्वामी- शिक्षण-स्वामी विवेकानंद-(ऑगस्ट 2012)

2. https://www.linkedin.com/pulse/%E0%A4%9C%E0%A4%9A%E0%A4%AF-%E0%A4%B9% E0%A4%A4-%E0%A4%AA%E0%A4%B3%E0%A4%A3%E0%A4%AF%E0%A4%9A-%E0%A4%A6%E0%A4%B0-%E0%A%A4-%E0%A4%9C%E0%A4%97%E0%A4%B2-%E0%A4%89%E0 %A4%A6%E0%A4%A7%E0%A4%B0-amol-umbarkar?trk=public_profile_article_view.

3. मेटे शुभांगी- भारतीय स्त्री आणि शिक्षण- https://www.mahaedunews.com/mete-shubhangi/ (मार्च 2022)

4. गुरु गोपाळ – वर्चस्व आणि सामाग्रिक चिकित्सा-हरिती पब्लिकेशन (जानेवारी 2015)

5. https://www.esakal.com/ampstories/web-story/dr-babasaheb-ambedkar-quotes-mahaparinirvan-diwas-2022-rak94

6. Census2011.co.in

---

*Cite this Article:*

Sonavane J.S. & Prof. Dr. Gaikwad M. N. (2023). ***भारतीय महिलाच्या विकासात शिक्षणाचे योगदान, अडचणी व उपाय – एक चिकित्सक अभ्यास***. In Electronic International Interdisciplinary Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 306–312). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10464606